नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २४४ Issue - 244 | वार सोमवार दि. २० जानेवारी २०२५ Blow- Monday Date 20 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### मुख्यमंत्री स्वित्झर्लंडमध्ये दाखल, झुरिच येथे पारंपरिक पद्धतीने स्वागत

मुंबई : स्वित्झर्लंडमधील दावोस येथे जागतिक आर्थिक परिषदेच्या (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) वतीने आयोजित गुंतवणूक परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून रवाना झाले. त्यांचे झुरिच येथे पारंपरिक भारतीय पद्धतीने औक्षण करून स्वागत करण्यात आले. स्वित्झर्लंडमधील भारतीय नागरिकांनी मोठ्या उत्साहाने फडणवीस यांची भेट घेतली. दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने २० ते २४ जानेवारी या कालावधीत ही परिषद आयोजित केली आहे. यापूर्वी फडणवीस हे त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कार्यकाळात तीन वेळा दावोसमधील या परिषदेत सहभागी झाले होते.

# महाकुंभ मेळ्यात सिलिंडर स्फोट

## १८ तंबूंमध्ये भीषण अग्नितांडव, जीवितहानी नाही



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज : उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित करण्यात आलेल्या महाकुंभ मेळ्याला भीषण आग लागली आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्याकरता अग्नीशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या आहेत. या आगीचे लोट दूरहून दिसत आहेत. दरम्यान, घटनास्थळी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ पोहोचले असून ते घटनेची चौकशी करत आहेत.

### अग्निशमन दलाच्या शर्थीच्या प्रयत्नांमुळे हानी टळली

प्राथमिक अहवालांनुसार, कॅम्प साइटवर आग लागली आणि त्या भागात बसवलेल्या अनेक तंबूंना या आगीने वेढले. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलचे एक पथकही घटनास्थळी दाखल झाले आहे. आग विझवण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलीस आणि अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. या आगीत १८ तंबूंना आग लागली आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रमोद शर्मा इंडियन एक्स्प्रेसला म्हणाले, महाकुंभमध्ये सिलिंडरच्या स्फोटामुळे आग लागली आहे. तर, प्रयागराज झोनचे एडीजी भानू भास्कर इंडिया टुडेला म्हणाले, महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १९ मध्ये दोन-तीन सिलिंडरचा स्फोट झला. त्यामुळे कॅम्पमध्ये मोठी आग लागली. आगीवर नियंत्रण मिळण्यात आले आहे. सर्व लोक सुरक्षित आहेत आणि कोणीही जखमी झालेले नाही.

महाकुंभ २०२५ च्या अधिकृत द हँडलने पोस्ट केले, खूप दुःखद! महाकुंभला लागलेल्या आगीच्या घटनेने सर्वांनाच धक्का बसला आहे. प्रशासन तात्काळ मदत आणि बचाव कार्य करत आहे. आम्ही सर्वांच्या सुरक्षिततेसाठी माँ गंगाकडे प्रार्थना करतो. या पोस्टमध्ये बाधित भागातून काळ्या धुराचे दाट लोट उठत असलेला व्हिडिओ देखील शेअर करण्यात आला आहे.

महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १९ मध्ये दोन सिलिंडरचा स्फोट होऊन शिबिरांमध्ये मोठी आग लागली. अग्निशमन दलाचे जवान आग विझवण्याचा प्रयत्न करत आहेत, असे आखाडा पोलिस स्टेशनचे प्रभारी भास्कर मिश्रा यांनी सांगितले.

# भारताचा महिला खो खो संघ ठरला वर्ल्ड चॅम्पियन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : खो खो विश्वचषक २०२५ मध्ये भारतीय महिला संघाने नेपाळचा ७८-४० असा पराभव करून प्रथमच विश्वविजेतेपद पटकावले आहे. सुरुवातीपासूनच भारताच्या लेकींनी दमदार कामगिरी दाखवत कोणत्याही संघाला पुनरागमनाची संधी दिली नाही. अंतिम सामन्यातही नेपाळने भारतासमोर पूर्णपणे गुडघे टेकले आणि भारताने बाजी मारली. प्रियांका इंगळेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने या सामन्यात इतिहास रचला आहे. खो-खो विश्वचषक पहिल्यांदाच आयोजित करण्यात आला आणि भारताने प्रथमच हे विजेतेपद पटकावले. अंतिम फेरीत भारतीय खेळाडूंनी अप्रतिम खेळ दाखवत नेपाळचा दमदार पराभव केला. पहिल्याच टर्नपासून भारतीय महिला खेळाडूंनी सामन्यावर वर्चस्व राखण्यास सुरुवात केली. भारतीय महिला संघाने पहिल्या टर्नमध्ये आक्रमण केले आणि नेपाळच्या बचावपटूंना प्रतिकार करता आला नाही, त्यानंतर भारताने ३४-० अशी सुरुवातीची आघाडी घेतली आणि येथून सामना त्यांच्या ताब्यात आला. प्रियंका इंगळेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने नेपाळला पुनरागमनाची एकही संधी दिली नाही. दुसऱ्या टर्नमध्ये नेपाळच्या संघावर आक्रमण करण्याची पाळी आली असताना त्यांना आघाडी मिळवता आली नाही. फक्त अंतर कमी करण्यात ते यशस्वी ठरले आहेत. दुसऱ्या टर्ननंतर स्कोअर ३५-२४ असा झाला.

दुसऱ्या टर्ननंतर बचावासाठी आलेल्या टीम इंडियाच्या बचावपटूंनी नेपाळच्या हल्लेखोरांच्या नाकावर टिचून मैदानात टिकून राहत शानदार बचाव करत १ गुण मिळवला. भारताने दुसऱ्या टर्नमध्ये बचावातून ड्रीम रनद्वारे १ गुणही मिळवला. तर, नेपाळच्या आक्रमणकर्त्यांनी २२ गुण मिळवले.

### भारताच्या लेकींनी घडवला इतिहास

तिसऱ्या टर्नमध्ये आक्रमण करत भारताच्या लेकींनी पुन्हा चमत्कार केला आणि नेपाळला सामन्यातून पूर्णपणे बाहेर केले आणि ३८ गुण मिळवले. त्याचवेळी नेपाळने बचावात एकही गुण मिळवला नाही.

चौथ्या टर्नमध्ये भारतीय महिला संघाने नेपाळच्या आक्रमणकर्त्यांना फारसे वर्चस्व गाजवू दिले नाही आणि बचाव करताना जबरदस्त खेळ दाखवला. या बदल्यात भारतीय महिला खेळाडूंनी नेपाळ संघाला सामन्यातून पूर्णपणे बाहेर केले. शेवटी सामना ७८-४० अशा गुणांवर संपला.

# सैफअली खान हल्लाप्रकरणी आरोपीला पोलीस कोठडी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर १६ जानेवारीच्या मध्यरात्री राहत्या घरी चाकूहल्ला करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर सैफ अली खानला तातडीने लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यानंतर त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. सध्या सैफची प्रकृती स्थिर असून त्याला रुग्णालयातून लवकरच डिस्चार्ज देण्यात येणार असल्याची माहिती सांगितली जात आहे. दरम्यान, सैफ अली खानवर चाकूहल्ला करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केलं आहे.

सैफ अली खानवर चाकूहल्ला करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केल्यानंतर आज आरोपी मोहम्मद शेहजादला मुंबईतील वांद्रे न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. यावेळी न्यायालयाने आरोपी मोहम्मद शेहजाद याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल न्यायालयाने सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. हो, मीच केलं, आरोपीची कबुली, सैफवरील हल्ल्याचे प्रकरण दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणात वेगवेगळा संशय व्यक्त केला. आरोपीकडे भारतातील कोणतेही वैध भारतीय कागदपत्र नसल्याची माहिती समोर येत आहे. तसेच तो बांगालादेशमधून बेकायदेशीरपणे भारतात आल्याचा संशय आहे. याबाबत आता पोलिसांच्या तपासानंतर अधिक माहिती समोर येणार आहे.

# ...तर त्याची पक्षातून हकालपट्टी केली जाईल : अजित पवार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी : उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पुढचा काळ हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राहील. गावागावात, चौकाचौकात आपल्या पक्षाचे कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. सर्वांनी समन्वयानं कामं केली पाहिजेत. महाराष्ट्राचा विकास सर्वांनी मिळून साधायचा आहे. विधानसभा निवडणुकीनंतर आपली जबाबदारी वाढली आहे. आगामी महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीच्या निमित्तानं उमेदवारीसाठी जे इच्छुक आहेत, त्यांनी एक जबाबदार कार्यकर्ता निवडला पाहिजे आणि त्या कार्यकर्त्यानं २५ घरांवर काम कलं पाहिजे. म्हणजे एका घरात ४ मतं धरली तर, १०० मतं मिळतील. आपल्याला अधिकाधिक तरुणांना पक्षात सामील करून घ्यायचं आहे. त्यात डॉक्टर, इंजिनियर, वकील यांचा समावेश असायला हवा, सध्या पक्षात अनेक जण येत आहेत, मात्र पक्षाची बेरीज झाली पाहिजे. पक्षाला कमीपणा यायला नको. जनमानसात प्रतिमा खराब असलेल्या व्यक्तीला पक्षात स्थान नाही. गैरवर्तणूक होता कामा नये. चुकीचं काम करणाऱ्यांची हकालपट्टी केली जाईल,

जनमानसात ज्याची प्रतिमा खराब असेल अशा लोकांना पक्षात घ्यायचं नाही अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली आहे. पक्षातील पदाधिकारी व नेत्यांकडून कोणतेही गैरवर्तन होता कामा नये, अशा सूचना देखील अजित पवार यांनी पक्षाच्या शिबिरातून नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. अजित पवारांच्या नेतृत्वाखाली शिर्डी येथे चालू असलेल्या पक्षाच्या नव-संकल्प शिबीर - २०२५ या मंथन शिबिरास आज अनेक नेत्यांनी हजेरी लावत पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील या शिबिरास उपस्थित असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराशी संवाद साधला.

# राज्यात पुन्हा थंडी वाढणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जानेवारी महिन्यांत खासकरून अनुभवास येणारी गुलाबी थंडीचा आनंद अद्याप तरी घेता आला नाही. जानेवारीचा तिसरा आठवडा सुरू झाला आहे. तरीही राज्यात गुलाबी थंडीची प्रतिक्षा कायम आहे. बंगालच्या उपसागरातून सातत्याने बाष्पयुक्त वारे राज्यात येत राहिल्यामुळे उत्तरेतील थंडी राज्यात पोहचलीच नाही. राज्यात प्रामुख्याने नोव्हेंबर, डिसेंबरची बोचरी, कडाक्याची थंडी कमी होऊन जानेवारी महिन्यात हमखास अल्हाददायी गुलाबी थंडी पडते. राज्यभरात किमान पारा, पहाटेचे तापमान दहा अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाऊन गुलाबी थंडीचा आनंद घेता येतो. यंदा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात उत्तर महाराष्ट्रात पारा आठ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आला होता. त्यानंतर विदर्भातील काही ठिकाणांचा अपवाद वगळता किमान पारा १३ ते १७ अंश सेल्सिअस दरम्यान राहिला आहे.

जानेवारी महिन्यातील पहिले दोन आठवडे संपून, तिसरा आठवडा सुरू झाला आहे. राज्यभरात उबदार रात्रीचा अनुभव येत आहे. पहाटे काहीकाळ पारा खाली जात असला तरीही दहा वाजताच पारा २० अंश सेल्सिअसच्या पुढे जाऊन दुपारपर्यंत २५ ते ३० अंश सेल्सिअसपर्यंत स्थिरावत आहे. त्यामुळे ऐन थंडीत दिवसा उकाड्याचा अनुभव येत आहे. गुलाबी थंडीसाठी आता जानेवारीतील दहा आणि फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरावड्याचाच काळ बाकी राहिला आहे. फेब्रुवारीच्या मध्यपासून तापमान वाढ जाणवू लागते. त्यामुळे यंदा गुलाबी थंडीला आपण मुकणार का ? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

हिमालयीन रांगांसह उत्तर भारतात पश्चिमी विक्षोप सक्रीय आहे. राजस्थान, दिल्लीसह उत्तर भारतात पारा पाच, सहा अंश सेल्सिअसपर्यंत खाली आला आहे. दाट धुकेही पडत आहे. पण, बंगालच्या उपसागरावरून सातत्याने बाष्पयुक्त वारे राज्यात येत राहिल्यामुळे उत्तरेतून थंड वारे राज्यात येण्यास अटकाव निर्माण झाला आहे. बाष्पयुक्त वाऱ्याचा जोर असल्यामुळे थंड वारे राज्यापर्यंत येत नाहीत. त्यामुळे रात्री उबदार, तर दुपारी उकाडा जाणवत आहे.

सध्या राज्यात किमान, कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त जाणवत आहे. पण, पुढील दहा दिवस राज्यभरात पहाटेच्या तापमानात २ ते ३ अंशांनी घट होण्याचा अंदाज आहे. किमान तापमान १० ते १२ अंश सेल्सिअसपर्यंत स्थिरावण्याचा अंदाज आहे. सध्याचा रात्रीचा ऊबदारपणा कमी होऊन, काहिशी थंडी जाणवण्याची शक्यता आहे, अशी माहिती निवृत्त हवामान शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.



## संपादकीय....

### वर्ल्ड चॅम्पियन

खो खो विश्वचषक २०२५ मध्ये भारतीय महिला संघाने नेपाळचा ७८-४० असा पराभव करून प्रथमच विश्वविजेतेपद पटकावले आहे. सुरुवातीपासूनच भारताच्या लेकींनी दमदार कामगिरी दाखवत कोणत्याही संघाला पुनरागमनाची संधी दिली नाही. अंतिम सामन्यातही नेपाळने भारतासमोर पूर्णपणे गुडघे टेकले आणि भारताने बाजी मारली. प्रियांका इंगळेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने या सामन्यात इतिहास रचला आहे. खो-खो विश्वचषक पहिल्यांदाच आयोजित करण्यात आला आणि भारताने प्रथमच हे विजेतेपद पटकावले. अंतिम फेरीत भारतीय खेळाडूंनी अप्रतिम खेळ दाखवत नेपाळचा दमदार पराभव केला. पहिल्याच टर्नपासून भारतीय महिला खेळाडूंनी सामन्यावर वर्चस्व राखण्यास सुरुवात केली. भारतीय महिला संघाने पहिल्या टर्नमध्ये आक्रमण केले आणि नेपाळच्या बचावपटूंना प्रतिकार करता आला नाही, त्यानंतर भारताने ३४-० अशी सुरुवातीची आघाडी घेतली आणि येथून सामना त्यांच्या ताब्यात आला. प्रियंका इंगळेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने नेपाळला पुनरागमनाची एकही संधी दिली नाही. दुसऱ्या टर्नमध्ये नेपाळच्या संघावर आक्रमण करण्याची पाळी आली असताना त्यांना आघाडी मिळवता आली नाही. फक्त अंतर कमी करण्यात ते यशस्वी ठरले आहेत. दुसऱ्या टर्ननंतर स्कोअर ३५-२४ असा झाला. दुसऱ्या टर्ननंतर बचावासाठी आलेल्या टीम इंडियाच्या बचावपटूंनी नेपाळच्या हल्लेखोरांच्या नाकावर टिचून मैदानात टिकून राहत शानदार बचाव करत १ गुण मिळवला. भारताने दुसऱ्या टर्नमध्ये बचावातून ड्रीम रनद्वारे १ गुणही मिळवला. तर, नेपाळच्या आक्रमणकर्त्यांनी २२ गुण मिळवले. तिसऱ्या टर्नमध्ये आक्रमण करत भारताच्या लेकींनी पुन्हा चमत्कार केला आणि नेपाळला सामन्यातून पूर्णपणे बाहेर केले आणि ३८ गुण मिळवले.

# अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूरला जिल्हास्तरीय कृतीशील शाळा पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अनुदानित, अंशत: अनुदानित, विनाअनुदानित शैक्षणिक संस्था, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या विविध मागण्या, प्रलंबित प्रश्नांचा शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून मार्गी लावण्याचा प्रयत्न करणारे पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार मा. दत्तात्रय सावंत सर यांच्या संकल्पनेतून साकारलेला यंदाचा मानाचा जिल्हास्तरीय कृतीशील शाळा पुरस्कार महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था ,अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूरला प्राप्त झाला.काल शनिवार दिनांक




१८ जानेवारी २०२५ रोजी सिंहगड इन्स्टिट्यूट, सोलापूर येथे पार पडलेल्या कृतीशील पुरस्कार सोहळा दरम्यान महाराष्ट्र राज्य कृती समिती चे संस्थापक व माजी शिक्षक आमदार मा. दत्तात्रय सावंत सर यांच्या शुभहस्ते शाल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे सर यांना गौरवण्यात आले. यावेळी प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे, जेष्ठ शिक्षक शहाजी माने, अप्पासाहेब काळे, धनंजय जोजन, सुरेश जाधव, शशी अंकलगे, प्रा. काशीनाथ पाटील, रमेश शिंदे, अब्दुल अजीज मुल्ला, शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी, प्रयोगशाळा सहायक श्री. स्वामीनाथ कोरे, ग्रंथपाल श्री. काशीनाथ हताळे, सेवक श्री. शिवप्पा घोडके उपस्थित होते.प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी या सोहळ्याप्रसंगी प्रशालेला कृतीशील शाळा पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल माजी शिक्षक आमदार मा. दत्तात्रय सावंत सर, समितीचे जिल्हा अध्यक्ष गुरुनाथ वांगीकर व समन्वयक श्री. परमेश्वर होसूरे यांचे आभार मानले. या पुरस्काराबद्दल मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व समस्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. सचिन दादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक आदरणीय श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारवड श्री. सिध्देश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरगावचे उपसरपंच व युवा नेते मा. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती,शिक्षण विभाग प्रमुख सौ. रूपाली शहा मॅडम, विज्ञान विभाग प्रमुख श्री. सौ. पुनम कोकळगी मॅडम यांनी अभिनंदन केले.

## क्षितीजदादा वनसाळे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका सरचिटणीसपदी नियुक्ती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

रविवार दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अधिवेशनात महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिळवळ यांच्या हस्ते व पुणे जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष प्रदिपदादा गारटकर, इंदापूर तालुका अध्यक्ष हनुमंत आबा कोकाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत इंदापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सरचिटणीस पदी क्षितीजदादा वनसाळे यांची निवडीचे पत्र देण्यात आले. क्षितीज वनसाळे हे इंदापूर तालुक्याचे विदयमान आमदार व महाराष्ट्र राज्याचे क्रिडा मंत्री दत्तात्रय भरणे यांचे निकटवर्तीय मानले जातात. यावेळी विधानपरिषदेचे आमदार अमोल मेटकरी, युवक प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण, पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिन सपकळ, अभिजित बनसोडे, संतोष तोरणे, सदाशिव सुर्यगंध, बाळासो कांबळे, श्रीमंत जाधव, आप्पासाहेब गोतसुर्यं हे उपस्थित होते.

यावेळी क्षितीज वनसाळे यांनी बोलताना सांगितले की, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, क्रिडा मंत्री दत्तामामा भरणे, जिल्हा अध्यक्ष प्रदीप दादा गारटकर, तालुका अध्यक्ष हनुमंत आबा कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष वाढीसाठी , पक्षाच्या ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी जास्तीत जास्त काम करण्याचा प्रयत्न करू.



## निलंगा वारकरी साहित्य परिषदेच्या दिनदर्शिकेचे पंढरपुर येथे प्रकाशन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : गेल्या कित्येक वर्षापासुन वारकरी साहित्य परीषदेच्या माध्यमातुन वारकर्यासांठी अहोरात्र काम करणारी संस्था मनुन वारकरी साहित्य परीषदेची ओळख असुन ,लातुर जिल्यातही गेल्या कित्येक वर्षापासुन जिल्हाध्यक्ष ह.भ.प श्रीधर धुमाळ महाराज यांच्या नेत्रत्वात गाव तीथे शाखा ,महिला भजनी मंडळ सह अनेक वारकर्यांना वारकरी साहित्य परीषदेच्या वारकरी समुहात अनेक जिल्यातील वारकरी जुडले असुन आज वारकर्यांसाठी अग्रगण्य स्थानी काम करनारी संघटणा मनुनही वारकरी साहित्य परीषदेकडे पाहीले जाते.

निलंगा तालुक्यातही वारकरी साहित्य परीषदेच्या माध्यमातुन गावागावात वारकरी साहित्य परीषदेचा प्रचार प्रसार करत वारकर्यांना एकजुट करण्यासाठी तत्परतेने काम करणारे निलंगा तालुकाध्यक्ष नामदेव सिरसल्ले यांनी कार्य करत असुन आज पंढरपुर येथे वारकरी साहित्य परीषदेचे अध्यक्ष ह.भ,प विठ्ठल पाटील काकाजी , ह,भ.प गोरक्षणाथ महाराज औसेकर सह कार्याध्यक्ष ह.भ.प माधव महाराज शिवणीकर .लातुर जिल्हाध्यक्ष ह.भ.प श्रीधर धुमाळ .महिला जिल्हाध्यक्ष चंद्रलेखा गुंडरे ,.मराठवाडा विभागीय अध्यक्ष ह .भ.प. कापडे गुरुजी,,ह.भ.प.रमेश महाराज सिरसले., दैवताबाई रमेश सिरसले.निलंगा तालुकाध्यक्ष नामदेव सिरसले. दिलीप दादा हुलसुरे , व्यंकटेश शिरोळकर ,गुरुदास शिंदे,माधव लांडगे,सुनिल मुळे, वसंत कदिरे, दिलीप दादा मोरे, ज्ञानेश्वर चांदुरे उत्तम शेळके गुरुजी सह वारकर्यांच्या उपस्थीतीत प्रकाशन सोहळा पार पडला.

## सामाजिक कार्यकर्ता प्रणाली जाधव यांना वनिता समाज गौरव पुरस्कार जाहिर



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

यवतमाळ/प्रतिनिधी : वनिता समाज, दादर, मुंबई यांच्या समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल यवतमाळ येथील ओवी फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा प्रणाली जाधव यांना 'वनिता गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. हा प्रतिष्ठित पुरस्कार २४ जानेवारी रोजी मुंबईतील वनिता समाज संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात प्रदान केला जाणार आहे.

पुरस्काराच्या स्वरूप धनादेश, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे आहे. प्रणाली जाधव या मुंबईच्या मुळच्या असून, त्यांनी मुंबईत उच्च शिक्षण घेतल्यानंतर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील दांडगा अनुभव मिळवला आहे. गेल्या चार वर्षांपासून त्या यवतमाळ येथे आदिवासी आणि भटक्या समुदायाच्या मुलांच्या शिक्षणासाठी पूर्णवेळ कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यामुळे स्थानिक समुदायाला लाभ होऊन अनेक मुलांच्या जीवनात शिक्षणाच्या नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत.

वनिता समाज हा पुरस्कार प्रणाली जाधव यांच्या कार्याचे गौरव करत आहे, ज्यामुळे त्यांचे कार्य आणि समर्पण समाजाच्या विकासासाठी प्रेरणादायक ठरले आहे. तर सर्व स्तरावरून सामाजिक कार्यकर्ते प्रणाली जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नारायण चिंचोली येथील सूर्यनारायण देव यात्रा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा





**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे ग्रामदैवत सूर्यनारायण देवाची यात्रा मोठ्या उत्साहात सुरू असूनही यात्रा पौष महिन्यातील महिनाभर चालते विशेषता:पौष महिन्यामधील रविवारी या यात्रेस अधिक महत्त्व असते दर रविवारी पंढरपूर तालुक्यातील जिल्ह्यातील हजारो भावी येथे दर्शनासाठी येत असतात नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण देवाचे अति प्राचीन मंदिरा असून ते मंदिर पुरातन हेमाडपंती आहे स्थापत्य रचनेतील हा अद्वितीय कलेचा नमुना आहे.

कोणार्क नंतर देशातील एकमेव असे महाराष्ट्रातील पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण देवाचे मंदिरातून विशेषतः पौष पाऊस महिन्यातील तिसऱ्या रविवारी देवाचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होतो १९ जानेवारी हा पालखी सोहळा मोठ्या भक्ती भावाने हजारो भाविकांच्या उपस्थित पार पडला.

या यात्रा काळात दर रविवारी सूर्यनारायण देव ट्रस्ट व ग्रामस्थ हा महाप्रसाद अन्नदाते यांच्या वतीने भाविकांना महाप्रसादेचे आयोजन केले जाते तसेच पालखी सोहळा पार पाडण्यासाठी सूर्यनारायण देव ट्रस्ट व संचालक मंडळ नारायण चिंचोली ग्रामस्थ सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य विविध सामाजिक संघटनेची पदाधिकारी तरुण वर्ग ग्रामस्थ व पालखी सोहळा पार पाडण्यासाठी त्यांचे मोलाचे सहकार्य लागते.

# पळसखेड चक्का व गुंज गावांमध्ये सनद प्रमाणपत्र वाटप

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाचे ग्रामविकास विभाग, भूमी अभिलेख विभाग तथा भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने महास्वामित्व योजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील गावांचे गावठाणातील मालमत्तांचे ड्रोन द्वारे सर्वेक्षण करण्यात येऊन मालमत्तांचे प्रमाणबद्ध नकाशे तयार झालेले असून संबंधित मालमत्तांच्या मालकी हक्कांबाबत शासकीय पुरावा अर्थात सनद तयार करण्यात आलेल्या आहेत.




त्या अनुषंगाने दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता मा. पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते महास्वामित्व योजनेअंतर्गत भारतभरात आज ५० लाखाहून अधिक घरमालकांना मालमत्ता कार्डचे / सनदचे वाटप करण्यात येत आहे.

मा. उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली आज सिंदखेड राजा तालुक्यातील पळसखेड चक्का आणि गुंज या दोन गावांमध्ये सनद प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. तसेच या सर्व सनद वाटपावर नियंत्रण अधिकारी म्हणून मा. तहसीलदार अजित दिवटे, मा. गट विकास अधिकारी मुकेश महोर, मा. उपअधीक्षक भूमि अभिलेख सिंदखेड राजा साळूबा वेताळ, मा.नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे यांनी काम पाहिले.

पळसखेड चक्का येथे आज मा. संजय खडसे यांच्या हस्ते नागरिकांना सनद वाटप करण्यात आली आहे सोबत,साळूबा वेताळ,डॉ. प्रवीणकुमार वराडे, भास्कर घुगे, नरेंद्र इंगोले, श्रीमती सुनिता खडसे, श्रीमती कविता नागरे, प्रकाश शिंदे,प्रवीण कुलकर्णी, सय्यद शोयब, सरपंच शिवानंद मुंढे, उपसरपंच उत्तम खजूरे, संतोष मुंढे, शिवानंद वैद्य तसेच ग्राम पंचायत सदस्य आणि गावातील नागरिक उपस्थित होते.

तसेच आपल्या तालुक्यातील दुसरी टीम ही गुंज येथे पाठवण्यात आली होती. या टीम मध्ये भूमी अभिलेख कार्यालयातील मारोती थोरवे, गोपाल वाघमारे, श्रीकांत बुलबुले, आयुष नायगावकर तसेच गुंज गावचे सरपंच श्रीमती नंदाताई सुरेश तुपकर, ग्राम पंचायत अधिकारी अर्जुन गवई, विस्तार अधिकारी पवार साहेब, तसेच गावातील सर्व ग्राम पंचायत सदस्य, नागरिक उपस्थित होते.

## बारामती बस स्थानकास विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या, अन्यथा आत्मदहन करणार : स्वराज्य शक्ती सेनेचे नेते प्रशांत सोनवणे यांचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : बारामती बस स्थानकास भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे म्हणून गेली वीस वर्षांपासून च्या मागणी कडे महाराष्ट्र शासनाने व बारामती चे लोकप्रतिनिधी मा शरदचंद्रजी पवार साहेब,मा अजितदादा पवार साहेब, सौ सुप्रियाताई सुळे खासदार जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत,

स्वराज्य शक्ती सेनेच्या संस्थापक अध्यक्षा सौ करुणाजी धनंजय मुंडे यांच्या आदेशानुसार दि १७ जानेवारी २०२५ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब यांना बारामती चे उपविभागीय अधिकारी साहेब यांच्या मार्फत निवेदन पाठविण्यात आले आहे, बारामती बस स्थानकास भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याबाबत तसेच बस स्थानक ज्या लोकांच्या जागेवर बांधण्यात आले आहे. काही भुमी पुत्रांना अद्याप पर्यंत एक रुपया ही मोबदला महाराष्ट्र शासनाकडून मिळाला नाही त्यांना चालु बाजार भावाप्रमाणे मोबदला मिळावा अन्यथा भारतीय प्रजासत्ताक दिनी दि २६ जानेवारी २०२५ रोजी बारामती बस स्थानकाच्या आवारात सकाळी नऊ वाजता मी प्रशांत विष्णु सोनवणे व माझे सहकारी दत्तात्रय वसंत माने आम्ही दोघे आत्मदहन करणार आहोत असे निवेदनात नमूद करण्यात आल्याची माहिती स्वराज्य शक्ती सेनेचे महाराष्ट्र प्रदेश सचिव मा प्रशांत विष्णु सोनवणे यांनी दिली आहे.

त्या वेळी स्वराज्य शक्ती सेनेचे पुणे जिल्हा महासचिव मा दत्तात्रय वसंत माने, बारामती तालुका अध्यक्ष महिबुब सय्यद, बारामती तालुका उपाध्यक्ष मा अजय आण्णा चौधरी, माळेगांव शहराध्यक्ष मा विठ्ठल सोनवणे,व इतर कार्यकर्ते उपस्थित होते,

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

थोडक्यात...




### नवऱ्याचे कर्ज फेडायचे आहे म्हणत पत्नीचा छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : सासरकडील मंडळींनी संगणमत करून नवऱ्याचे कर्ज फेडण्यासाठी माहेरून दोन लाख रुपये घेऊन ये असा तगादा लावून पत्नीला शिवीगाळ व मारहाण करून मानसिक त्रास देऊन छळ केल्याची फिर्याद कविता संतोष केगनाळ (वय-२६,रा.१८ स्टेशन रोड,जुलाई गल्ली,गच्चीमाल जिल्हा विजापूर,राज्य कर्नाटक) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती संतोष, सासरे सूर्यकांत (रा.१८ स्टेशन रोड जुलाई गल्ली,विजापूर) मोठी नणंद श्रीदेवी कंगोड (रा. महालतांडा,विजापूर) विद्या शिवानंद बिराजदार व शोभा रेवनसिद्ध तडलगी (रा.कन्नूर दर्गा,विजापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २५ जून २०१४ ते आज तगायापर्यंत फिर्यादी यांच्या सासरी कर्नाटक येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

# नळदुर्गच्या घाटात भिषण अपघात; तब्बल २०० फुट फरफरट नेले युवकाला

## नागरीकांचे हायवेवर तिन तास ठिय्या अंदोलन करत चक्का जाम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :

नळदुर्ग येथे राष्ट्रीय हायवे वर सतत आपघाताचे सत्र सुरूच आसुन अनेकांचे आपघात होऊन संसार उद्धवस्त झाले आहेत ही घटना आजची नाहीतर जेव्हा पासुन राष्ट्रीय हायव महामार्गाचे रुंदीकरणाचे काम चालू झाल्या पासुन हा आपघाताचा प्रकार भयानक वाढला आहे या अरुंद रस्त्याकडे कोणी पाहिले नाही गुत्तेदाराचे किंवा ठेकेदाराचे जाणीव पुर्वक दुर्लक्ष होत गेले आहे म्हणूनच आपघाताचे प्रमाण वाढले आहे.

नळदुर्ग शहरातील दोन यूवक स्वतःच्या मोटार सायकल क्रमांक M H 25 46 85 वरून अमित खंडु नागणे व शिवराम खंडु नागणे हे दोघे शेताकडे जात आसताना सोलापूर कडून हैद्राबाद कडे जाणाऱ्या क्रमांक G J 36 V 8268 ह्या ट्रकने वरिल मोटार सायकलला पाठीमागून जोराची धडक देऊन संबंधीत यूवक शिवराम खंडु नागणे वय वर्ष ३३ हा उडुन १० ते १५ फूट लांब पडला तर अमित खंडु नागणे वय वर्ष ३१ वर्ष ह्या युवकाला किमान २०० फुट फरफटत नेऊन चक्काचूर केले आहे.

सदरील यूवक शेताकडे जात आसताना ही घटना घडली आसुन हा आपघात खूप भयानक आहे हा आपघात होताच संबंधीत ट्रक आडवली आसुन चालकाला जेरबंद केले आहे . संबंधीत हायवे रोड महामार्ग चालू न केल्या मुळे हा आपघात झाला आहे कारण हायवेचे काम चालू झाल्या पासुन आजतागायत रोडचे रुंदी करणाचे पुर्ण झाले आहे . संबंधीत हायवे गुत्तेदार व ठेकेदार यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा नोदं करावा आशा प्रकारची मागणी नागरीक करत हायवेवर तब्बल तिन दास चक्का जाम करण्यात आला.



दोन्ही यूवक नळदुर्ग येथील रहिवाशी आसुन ते शेतीकडे वाटचाल करीत होते ऐवढी भयानक आपघात झाला संबंधीत यूवक आरडा ओरड करत होता परंतू त्या ट्रक चालकाला दया आली नाही तो २०० फुट फरफटत वडत घेऊन गेला त्या तरुण युवकाला चक्काचूर केला अक्षरशः जेष्ठ पत्रकार विलास येडगे काही पोलीस कर्मचारी यांनी डुकडे झालेले मांस एका कॅरीबॅग मध्ये तर काही कपडयावर मास गोळा करून घेऊन गेले .यांच्या हायवे गुत्तेदार व ट्रक चालक यांच्या विरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे आंबाबाई ट्रस्टीचे चेअरमन रमेश जाधव सह काही नागरीकांच्या विचाराने हा हायवे महामार्ग चालू झाला यांनी गुन्हा नोंद केला आहे.

### अखेर नळदुर्ग पोलीस ठाण्यात संबंधीत हायवेचे गुत्तेदार चालक यांच्यावर गुन्हा दाखल

यावेळी नळदुर्ग ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे सहाय्यक पोलीस निरिक्षक कागुणे, उपनिरीक्षक गिते सह हायवे महामार्ग पोलीस गांधले राजू चव्हाण, पंकज कोळी, दिंगबर कुंभार, सतीश पवार, उध्दव टोपे, काझी, कदम, मोरे इतर कर्मचारी उपस्थित होते.

# मधमाशीपालन व्यवसाय शाश्वत विकासासाठी आवश्यक : ध्रुवकुमार बनसोडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शाश्वत विकासासाठी मधमाशीपालन व्यवसाय अत्यंत आवश्यक आहे. शेती क्षेत्रातून भरगोस उत्पादन मिळविण्यासाठी परागीभवन गरजेचे असते ते काम मधमाशा सहजपणे करतात. म्हणूनच या व्यवसायासाठीची आवश्यक कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी, असे मत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, सोलापूर येथील जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ध्रुवकुमार बनसोडे यांनी व्यक्त केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या, कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) योजनेंतर्गत 'महाविद्यालयीन प्राध्यापकासाठी व विद्यार्थ्यांसाठी' आयोजित 'मधमाशीपालन' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटक म्हणून ध्रुवकुमार बनसोडे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचे अधिष्ठाता



डॉ. अनिल चोपडे, रुसा समन्वयक प्रा. योगेश पाठक, डॉ. चंद्रकांत काळे, प्रा. रेश्मा माने, डॉ. अमर कांबळे, डॉ. अमोल मामलाय्या, डॉ. शिल्पा पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

ध्रुवकुमार बनसोडे यांनी यावेळी महाबळेश्वर येथे असलेल्या केंद्राविषयी माहिती दिली. तसेच शासनाकडून सुरु असलेल्या विविध योजनाची माहिती दिली. त्यामध्ये मधकेंद्र योजनेवर विस्तृत प्रकाश टाकला. सदर केंद्राकडून मोफत प्रशिक्षण, आवश्यक साहित्य व विद्यावेतन देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले, विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले. प्रथम सत्रामध्ये मधुक्षेत्रिक महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, सोलापूर, प्रभाकर पलवेंचा यांनी मधमाशीच्या जाती, त्यांची पोळ्याची रचना, मध तयार होण्याची प्रक्रिया, परागीभवनाचा कोणत्या पिकांना फायदा होतो यावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रामध्ये चाकूर येथील व्यावसायिक दिनकर पाटील यांनी मधमाशीपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर कसा करावा



व यामध्ये समाविष्ट असलेल्या शास्त्रीय बाबींवर मार्गदर्शन केले. या वेळी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये एपिस मेलीफेरा या माशीची पेटी ठेवण्यात आली. सर्व सहभागी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना या माशा दाखविण्यात आल्या व त्या माशा हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. दुपारील सत्रात शुद्ध मध ओळखण्याची तंत्रे शिकविण्यात आली. तसेच सामुहिक पद्धतिने मधाची चवही चाखण्यात आली. या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते. त्यांनी महाविद्यालयामध्ये अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. अमोल मामलाय्या यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस.एस. काळे व प्रा. कु, एस. आर. वाघमारे यांनी केले तर आभार प्रा. हर्षदा चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासठी केतन अल्लापुरकर, प्रा. दिव्या गायकवाड, प्रा. कविता कुलकर्णी, प्रा. एस.ए. भोसले यांनी परिश्रम घेतले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंखेने उपस्थित होते.



### कास्ट्राईब संघटनेच्या वतीने कळंब आगारात डॉ. राकेश जानराव यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब:सुधाकर रणदिवे, दि. १७ जानेवारी २०२५ रोजी डॉ. राकेश जानराव साहेब( सहाय्यक वाहतूक अधीक्षक) यांना सोलापूर विद्यापीठाची अर्थशास्त्र विषयात ( झक्ऊ ) डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल कास्ट्राईब संघटनेच्या वतीने कळंब आगारामध्ये आगार प्रमुख खताळ साहेब यांच्या उपस्थिती मध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी कास्ट्राईब संघटनेचे विभागीय कार्याध्यक्ष रत्नाकर जोशी, कळंब आगाराचे अध्यक्ष सुबोध रणदिवे, कोषाध्यक्ष प्रशांत गायकवाड, औसेकर मॅडम, संघरक्षित गायकवाड, सुशील हुंबे, विलास जाधव, लखन कांबळे साहेब, अभिजीत गायकवाड, चेतन गोसावी व प्रभाकर झांबरे व ईतर कामगार व कर्मचारी उपस्थित होते.



# जनता विद्यालय नांदुर्डी येथे आनंद मेळावा साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालय नांदुर्डी येथे स्काऊट गाईड अंतर्गत आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी मविप्र समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर व माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष बोराडे यांच्या हस्ते स्काऊट गाईड ध्वजाचे ध्वजपूजन व ध्वजारोहण करून यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले, याप्रसंगी गीत मंचाने राष्ट्रगीत स्काऊट गाईड ध्वज गीत व प्रार्थना गीतमंचाने सादर केली, कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक म्हसकर बी डी व नियोजन पर्यवेक्षक .दाते आर पी यांच्या मार्गदर्शनाखाली आहेर एस आर , आहेर पी एस , गोतरणे एन जे यांनी नियोजन केले या कार्यक्रमासाठी जनता विद्यालय माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष बोराडे , उच्च माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष एकनाथ पा.निकम, अभिनव बाल विकास अध्यक्ष सितराम पा.ढोमसे लासलगाव बाजार समिती संचालक काळे, विकास जाधव, आकाश डुंबरे ,अभिजीत शिंदे, सतीश भोसले ,लक्ष्मणराव निकम, ज्ञानदेव ढोमसे ,रोहिदास निकम ,जनार्दन कुंभार्डे ,सुभाष आहेर, आदेश जाधव ,योगेश निफाडे ,बाजीराव खापरे ,रोहिदास फकट पंचक्रोशीतील पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते ,या वेळी विविध प्रकारचे स्टॉल विदयार्थीनी लावलेले होते, विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान मिळवण्यासाठी वस्तू खरेदी विक्री व विविध ज्ञान मिळावे या हेतूने हा आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता . यावेळी बाळासाहेब क्षीरसागर यांनी प्रत्येक स्टॉल जवळ जाऊन विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाबद्दल व त्यांनी केलेल्या पदार्थांबद्दल माहिती घेऊन .अभिनंदन केले या कार्यक्रमासाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक शिंदे टी जी,सेवक सोसायटी संचालक जाधव डी जी , पगारे आर, व्ही पवार व्ही के ,किरकाडे के पी, डुकरे एन जी ,शेंडे यु बी ,निकम एस डी ,सतीश संगमनेरे ,संजय खापरे, ज्ञानेश्वर खापरे ,सुनील शिंदे ,श्रीमती शिंदे डी पी ,मोतींगे एस आर, घुमरे आर आर, कटारे एम ए, कदम एस एन, कुंदे एन डी व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले,

सहा ठिकाणी कारवाई; चार लाख ५१ हजाराचा दंडवसूल

तहसिलदार सचिन लंगुटे यांची माहिती

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल पथकाने मौजे.चिंचोली भोसे (ता. पंढरपूर) भीमा नदीपात्रात अवैध वाळू उपसा करण्यासाठी येणारा एक जेसीबी क्रमांक (क्र.एमएच १० एस ७५२२) आज जप्त करण्यात आला आहे.

तसेच दि. ०३ ते १९ जानेवारी या कालावधीत महसूल पथकाने तालुक्यात विविध ठिकाणी अवैध वाळू वाहतूकीवर कारवाई करुन चार लाख ५१ हजार ७०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आला



असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. मौजे.चिंचोली भोसे ता.पंढरपूर येथे भीमा नदी पात्रात अवैध वाळू उत्खनन करून पळून जाताना आज एक जेसीबी जप्त करण्यात आला असून सदर वाहन शासकीय धान्य गोदाम येथे ठेवण्यात आले आहे. तसेच दि. ०३ ते १९ जानेवारी२०२५ या कालावधीत तालुक्यात अनवली, रोपळे, गुरसाळे, ओझेवाडी, चिंचोली तसेच पंढरपूर शहरातील जुना दगडी पुल या ठिकाणी अवैध वाळू उत्खनन व वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दोन जेसेबी, चार वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच मौजे ओझेवाडी येथील २.५० ब्रास वाळूसाठा नष्ट करण्यात आला आहे.

मौजे.चिंचोली भोसे ता.पंढरपूर या कारवाईमध्ये पथक प्रमुख मंडळाधिकारी रवींद्र शिंदे, विजय शिवशरण, ग्राम महसूल अधिकारी संजय खंडागळे, सुमित जाधव, संदीप शिंगारे, महेशकुमार सावंत, गणेश पिसे, महसूल सेवक कुंडलिक शिंदे सहभागी होते.

### राजारामनगर महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कर्मवीर रा.स.वाघ शैक्षणिक व आरोग्य संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान राजारामनगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन कादवा कारखान्याचे चेअरमन श्रीरामजी शेटे यांचे हस्ते कादवा कारखाना कॉलनी राजारामनगर येथे संपन्न झाले.

याप्रसंगी कादवा कारखान्याचे व्हा.चेअरमन शिवाजीदादा बस्ते, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शहाजीदादा सोमवंशी, संस्थेचे सचिव बाळासाहेब उगले, कादवा कारखान्याचे संचालक मधुकर अण्णा गटकळ, नामदेवराव घडवजे, रघुभाऊ जाधव, अमोल भालेराव, दादासाहेब पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य भाऊसाहेब उगले, वाळूभाऊ गटकळ, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रदीप तिडके, बी.



के. कावळे विद्यालयाचे प्राचार्य व्ही.जे. जाधव, कादवा इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक डी.व्ही. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संबोधित करताना या शिबिराच्या माध्यमातून संस्कारक्षम विद्यार्थी घडावेत व त्याद्वारे उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावला जावा असा आशावाद श्रीरामजी शेटे यांनी व्यक्त केला. त्यासाठी विद्यार्थी, शिक्षक व पालक यांनी एकत्र मिळून प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. गवळी एन.व्ही, प्राध्यापक सोनवणे ए.ए, श्रीमती डॉ.पाटील एस.ए, लोखंडे आर.बी, गांगुर्डे आर.ए, कु. शेखरे जे.एस, दाभाडे एस. के, तसेच महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी पवार एस. के, सहा. प्रा.बाऱ्हाते एस. बी, सहा.प्रा.डोखळे एन. डी, शिक्षकेतर कर्मचारी कु. जाधव एस. एस., श्री. धुळे जी.के., ग्रामस्थ व विद्यार्थी स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

# एनटीपीसी प्रकल्पः सोलापूरच्या पर्यावरणाला सुरक्षित, विमानतळासाठी अडथळामुक्त

## सोलापूर विकास मंचच्या औद्योगिक दौऱ्यात महत्त्वपूर्ण माहिती उघड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी एनटीपीसी सोलापूर प्रकल्पाला भेट देत प्रकल्पाबाबत नागरिकांच्या मनातील शंका दूर केल्या. या प्रकल्पामध्ये अत्याधुनिक आणि जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या चिमणीमधून प्राणघातक रसायन हवेत सोडले जात नाही; फक्त पाण्याचा वाफ बाहेर पडतो. यामुळे सोलापूरच्या पर्यावरणीय तापमानावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही. एन.टि.पी.सी. सोलापूर प्रकल्पातुन तयार होणारी वीज पाच राज्यांत पॉवर ग्रीड च्या माध्यमातून वितरीत होते ज्याचा अर्धा वाटा महाराष्ट्र राज्य आणि अर्धा इतर राज्यांना पुरवठा होतो.




एनटीपीसी सोलापूर प्रकल्प राष्ट्रीय धरोहर असून, महत्त्वाचा वीज निर्मिती प्रकल्प आहे जो स्थानिक समुदायांना ऊर्जा पुरवतो. या प्रकल्पाने पर्यावरण संवर्धनाच्या वचनबद्धतेतून दरवर्षी ५०,००० झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. आजपर्यंत पाच लाखांहून अधिक झाडे लावली गेली असून त्यातील ८० टक्के झाडे जगली आहेत, हा उल्लेखनीय यशाचा दाखला आहे.

दौऱ्यादरम्यान एनटीपीसी सोलापूर प्रकल्पाचे मुख्य महाव्यवस्थापक तपन कुमार बंडोपाध्याय, नवीन कुमार अरोडा (महाप्रबंधक अनुरक्षण), बिपुल कुमार मुखोपाध्याय (महाप्रबंधक, ऑपरेशन्स), मनोरंजन सारंगी (महाप्रबंधक एचआर), कविता गोयल (डीजीएम एचआर), विजयकुमार कोनापरेड्डी (एचआर) आणि लबीब अख्तर (एचआर) यांसह सर्व विभाग प्रमुखांनी सदस्यांचे स्वागत केले.

सोलापूर विकास मंचच्या केतन शहा, विजय कुंदन जाधव, मनोज क्षीरसागर, अमृता अकलुजकर, महेश हणमे, प्रशांत भोसले, अक्षय फडके, प्रसन्न नझारे, राहुल होनकळस, ॲड. दत्तात्रय अंबुरे आदी सदस्यांची उपस्थिती होती. सोलापूर विकास मंचाच्या या दौऱ्यामुळे औद्योगिक क्षेत्रात सोलापूरच्या तरुणांना नवीन प्रेरणा मिळण्यास मदत होईल, अशी आशा आहे.

**प्रकल्पाच्या चिमणीबाबत सोलापूर विमानतळाच्या विकासासाठी कोणतीही अडचण नाही, कारण सर्व परवानग्या डीजीसीए व एएआयकडून घेतल्या असल्याची माहिती प्राप्त झाली. सोलापूर विकास मंचने या औद्योगिक दौऱ्यादरम्यान एनटीपीसीच्या कार्यपद्धतीबाबत सखोल माहिती मिळवली, ट्रबाईन आणि नियंत्रण कक्षाची पाहणी देखील मंचच्या सदस्यांनी केली. या दौऱ्याचे आयोजन तरुणाईला प्रेरणा आणि सोलापूरकरांच्या मनातील शंकांचे निरसन करण्यासाठी आले होते. मंचाने यापूर्वीही प्रिसिजन कॅमशाफ्ट लिमिटेडला भेट दिली असून, भविष्यातही विविध उद्योगांना भेटी देऊन त्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला जाणार आहे.**

## थोडक्यात...

### महिलेच्या गळ्यातील मिनी गंठण हिसकावले

सोलापूर, (प्रतिनिधी) : लग्न कार्यावरून घरी येत असताना होडगी रोडवरील शंकर नगर मधील कामशेट्टी यांच्या हार्डवेअर दुकानासमोर अचानकपणे फिर्यादी शरीफा मौला शेख (वय-५८,रा. होटगी रोड) यांच्यासमोर दुचाकी वाहनावर दोघे अज्ञात इसम वेगात येऊन गाडी सावकाश केली. त्यानंतर पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादी शरीफा शेख यांच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण हिसकावून नेले असल्याची असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.ही घटना १६ जानेवारी रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास शंकर नगर येथे घडली.शरीफा शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोघा अज्ञात इस्मविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहेत.






# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास एक लक्ष रुपयाची देणगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस चंद्रकांत भीमाशंकर फत्तेपुरकर राहणार सोलापूर या भाविकांने धनादेश स्वरूपात एक लक्ष रुपयाची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल दानशूर भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे विभाग प्रमुख राजेश पिटले यांच्या हस्ते उपरणे व श्रीची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांची कुटुंब व विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार उपस्थित होते.

# स्वामी भक्तांसाठी अन्नछत्र न्यासाच्या उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे सुलभ महाप्रसाद वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे/वालचंदनगर : अक्कलकोट श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून उत्कृष्ट व्यवस्थापन होत असल्याने स्वामी भक्तांना सुलभ महाप्रसाद मिळत असल्याने दर्शनानंतर अन्नछत्रात येऊन आम्हा भक्तांना महाप्रसाद घेतल्याचे मोठे समाधान असल्याचे मनोगत वालचंदनगर इंडिस्ट्रिज लि. मधील आय. एम. डी. कामगार समन्व्य संघ वालचंदनगर माजी अध्यक्ष नंदकुमार गोंडगे यांनी व्यक्त केले.



### वालचंदनगर इंडस्ट्रिज माजी अध्यक्षांचे कौतुक

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आल्या असता न्यासाचे अप्पू पुजारी, यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. यावेळी, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, गोटू माने, निखील पाटील, योगेश कटारे, राहुल इंडे, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, एस के स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# जुना बोरामणी नाका येथे अपघात; एकावर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : जुना बोरामणी नाका येथे झालेल्या अपघात प्रकरणी एका जनाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना १६ जानेवारी रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी अनिल आनंदराव शिंदे (वय-४५-,रा.मु. पोस्ट बसतवडे,ता. तासगाव,जि.सांगली) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून रोहित महादेव बिंदले (वय-३०-,रा.मु.पोस्ट आरक,ता.मिरज,जि.सांगली) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की,फिर्यादी हे त्यांच्या दुचाकीवरून मार्केट यार्ड सोलापूर येथून फळे घेऊन घराकडे जात असताना ट्रक क्रमांक एमएच.१३.ए.के.४६८७ यातील चालक याने त्याच्या ताब्यातील ट्रक हा निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीस धडक देऊन त्यांच्या पायास गंभीर जखमी करत फॅक्चर होण्यास कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मस्के हे करीत आहेत.

# भारतीय जनता पार्टी सदस्य नोंदणी; बार्शी शहर व तालुका प्रभारीपदी प्रशांत ताटे देशमुख यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तात्या देशमुख उपाध्यक्ष भारतीय जनता माळशिरस तालुका यांची सदस्य नोंदणी अभियान बार्शी शहर व तालुका प्रभारी पदी निवड झाल्यामुळे त्यांनी तात्काळ बार्शी तालुक्यातील वैराग येथील शिवराज भोपाळे जिल्हाध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चा सोलापूर यांच्या उपस्थितीत विविध ठिकाणी सदस्य अभियान संदर्भात बैठक घेऊन रेफरल कोड काढणे ऑनलाईन नोंदणी करणे याविषयी कार्याल कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी वैराग व परिसरातील युवक कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणे होते वैराग येथील मातोश्री मंगल कार्यालय येथे कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली यावेळी कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले व या नोंदणी सुरुवात झाली यावेळी राळेरास हाती वैराग शहर ग्रामीण या ठिकाणचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होतो कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री उदय क्षीरसागर पदाधिकारी नेते आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले आहे.

# शिक्षणामुळे समाजाची प्रगती : निंगप्पा निंबाळ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधानी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे गांधीनगर तांडा रहिवासी शंकर रामू पवार व मुन्नाभाई शंकर पवार त्यांच्या दोन मुलगा फुलचांद शंकर पवार शिक्षक व महेश शंकर पवार सी.आय.एस. एफ. दोघे भाऊ सरकार क्षेत्रांमध्ये नोकरी लागल्यामुळे गांधीनगर येथे सत्कारच नियोजन आयोजित करण्यात आले होते त्यावेळी तंडाची नाईक रविदास राठोड सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले यावेळी प्रमुख उपस्थित दैनिक यश सिद्धी न्युज चा पत्रकार निंगाप्पा निंबाळ सामाजिक शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य व पत्रकार दिनानिमित्त पवार कुटुंबच्या तांडाचं नायक रविदास राठोड धेनू राठोड हस्ते सत्कार करण्यात आले या प्रसंगी प्रत्येक घरातील मुला शिक्षण घेऊन साक्षर झाले कि आपोआप समज प्रगती होतील असे मत म्हणत होते. यावेळी शिवयोगी ठक्क मलक मंतू हौदे तेजूराम चव्हाण विजयकुमार राठोड, अनिल चव्हाण, महेश राठोड, गोपी राठोड आदी गांधीनगर नागरिक व महिला सहित मोठ्या संख्या ने उपस्थिती होते.

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी प्रताप मोरे यांची फेरनिवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी : अखिल भारतीय ग्रामीण संघटनेच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली त्यामध्ये बुलढाणा जिल्हा घाटावर जिल्हा अध्यक्ष म्हणून देशोन्नतीचे पत्रकार प्रताप मोरे यांची फेरनिवड करण्यात आली तर जिल्हा कार्यअध्यक्ष पदी लोणार येथील सागर पनाड यांची नियुक्ती करण्यात आली. अशा या निवडीचे प्रसिद्धी पत्रक संघटनेचे प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख यांनी काढले आहे.बुलढाणा जिल्ह्यात गेल्या ३० वर्षापासून दैनिक देशोन्नती मध्ये निर्भीड व शोध उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट वृत्तकथा, उत्कृष्ट समाज कार्य आणि त्याचं बरोबर वर्षभरापासून अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेमध्ये जिल्हा अध्यक्ष पदावर जबाबदारीने प्रदेश अध्यक्ष कैलास बापू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे कार्य वाढविणे,पत्रकाराच्या अडीअडचणी सोडविणे, त्यांच्या पाठीशी ताकतीने उभे राहणे,कामाचा पाठपुरावा करणारे पत्रकार प्रताप मोरे यांची अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या बुलढाणा जिल्हा घाटावरील जिल्हा अध्यक्षपदी पुन्हा फेरनिवड करण्यात आली आहे. तसेच लोणार येथील सकाळ पेपरचे प्रतिनिधी सागर पनाड यांची जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली.वरील नियुक्ती अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय अध्यक्ष मनोहरराव सुने,केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान,केंद्रीय संपर्क प्रमुख प्रा रविंद्र मेंढे,केंद्रीय कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे ,केंद्रीय सदस्य अभिमन्यू भगत, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख ह्यांनी केली आहे. आता लवकरच जिल्ह्यातील सर्व तालुक्यात संघटनेचे पदाधिकारी यांची निवड करण्यात येईल या फेरनिवडीमुळे जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधव, लोकप्रतिनिधी,तथा गावाकरी आणि मित्र मंडळामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अभिनंदनाचा शुभ वर्षाव होत आहे.

### ११ लाख २५ हजार रुपये मुद्देमाल जप्त

### चाकचा धाक दाखवून मोबाईल व पिकअप गाडी चोरली

# पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची तीन आरोपींवर मोठी कारवाई

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका मध्ये चाकूचा धाक दाखवून मोबाईल आणि पिकप गाडी चोरणाऱ्या तीन आरोपींना पंढरपूर तालुका पोलिसांकडून अटक आरोपीकडून एकूण आकरा लाख २५ हजार रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पंढरपूर तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४५/२०२५ बी एन एस कलम ३०९(६) या रॉबरीच्या पुण्यातील आरोपींनी मध्य प्रदेश पासिंगची पिकप गाडी क्रमांक एमपी ०९५३०१० या गाडीच्या चालकाला चाकूचा धाक दाखवून चालकाला लाथा भुक्क्याने मारहाण करून पिकप गाडी जबरदस्तीने चोरून पिकप गाडी घेऊन पळून गेले होते सदर पुण्यामध्ये आरोपींच्या वर्णनावरून एकूण तीन आरोपी ताब्यात घेण्यात आलेली




असून त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे.

आरोपीची नावे एक गोविंद लिंबा पवार वय (२३) वर्ष राहणार अंकोली तालुका मोहोळ, २. नेपाल अहमद शेख वय (२१) २१ वर्षे राहणार चिंचोली तालुका पंढरपूर, ३. संचा मिटकरी वय (३२) ३२ वर्ष राहणार आंबे चिंचोली तालुका पंढरपूर असे तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून फिर्यादीचे दोन मोबाईल फोन एक पिकप गाडी त्यांचा क्रमांक एमपी ०९५३१० असा आहे एकूण किंमत रुपये ११ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून आरोपींना अटक केलेली आहे.

सदर गुन्हा घडल्यापासून काही तासात आरोपींना अटक करून गुन्हा उघडकीस आणण्याची कामगिरी माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी व माननीय अपर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर, माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री तय्यब मुजावर, पीएसआय श्री भोसले साहेब, पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन माळी, पोलीस हेड कॉन्स्टेबल विनायक क्षीरसागर, एस आय तोंडले, पोलीस हेडकॉन्स्टेबल रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी, पोलीस कॉन्स्टेबल आवटी यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.